Phone - 9167563793
E-mail – rapc@mu.ac.in

# University of Mumbai

**Research Administration & Promotion Cell,**
UNIVERSITY of MUMBAI,
Kalina Campus, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai – 400 098.

प्रवि/आय.सी.सी/२०२२–२३/०६

## परिपत्रक

**विषय :– शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून संशोधन केंद्रास स्थायी संलग्नीकरण व मान्यता बाबत.**

मुंबई विद्यापीठ संलग्नीत संशोधन केंद्रांचे / संस्थांचे (Research Center) प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या **सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ मधील कलम ११६** च्या तरतुदींनूसार ज्या मुंबई विद्यापीठ मान्यताप्राप्त महाविद्यालयांतील संशोधन केंद्र / संस्था यांना शैक्षणिक वर्ष २०२३–२४ साठी स्थायी संलग्नीकरण व मान्यता **(Permanent Recognition)** प्रस्ताव सादर करावयाचे आहे त्यांनी आपले प्रस्ताव दि. ३० सप्टेंबर २०२२ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करावे व सदर प्रस्तावाची हार्ड कॉपी संबंधीत कागदपत्रासहीत संशोधन प्रशासन व प्रोत्साहन कक्ष (RAPC), रुम नं. १०३, नॅनोसायन्स व नॅनोटेक्नॉलॉजी बिल्डिंग, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ, सांताक्रूझ, मुंबई – ४०००९८ येथे दि. १ ऑक्टोबर, २०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष सादर करावी. सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी **www.muonline.org.in** या संकेतस्थळाचा वापर करावा. सदर संकेतस्थळ दि. ०१ सप्टेंबर, २०२२ रोजीपासून उपलब्ध करण्यात येईल.

कृपया, मुंबई विद्यापीठाचे परिपत्रक क्र. संलग्नता/आय.सी.ई/२०१६–१७/१४ पहावे. सदर परिपत्रकाद्वारे महाविद्यालयाचे संलग्निकीकरण करण्याची प्रक्रिया संगणकाद्वारे करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने महाविद्यालयांमधील संशोधन केंद्रे व संशोधन संस्था यांचेही मान्यतेचे **(Recognition of Research Centre)** काम संगणकीकरणाद्वारे करावयाचे प्रस्तावित आहे. ज्या संशोधन केंद्रांनी व संशोधन संस्थांनी अद्याप पर्यंत ऑनलाईन नोंदणी केलेली नाही, अशा सर्व संशोधन केंद्रे व संशोधन संस्था यांनी ऑनलाईन नोंदणी करुन **Login ID** व **Password** प्राप्त करुन घेणे आवश्यक असेल. ऑनलाईन नोंदणी **Login ID** व **Password** प्राप्त करुन घेण्यासाठी खालील सुचनांचे पालन करावे.

१. प्रथम **www.muonline.org.in** (Helpline No.07722065283 / 84) या संकेतस्थळाला भेट द्यावी व होमपेज वरील **Get Login for Research Institute** या लिंक वर जावे. (जर संशोधन संस्थेकडे Login ID नसेल तर)

२. आपल्या संस्थेचे नांव, प्राचार्य / संचालकाचे नांव व मोबाइल क्र. नमूद करावा.

३. संशोधन संस्था मान्यतेचे (Latest Recognition Letter) शेवटचे / अलिकडचे पत्राची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी. जर एकापेक्षा जास्त विषयांना मिळालेली असेल तर

# University of Mumbai

Phone - 9167563793
E-mail - rapc@mu.ac.in

Research Administration & Promotion Cell,
UNIVERSITY of MUMBAI,
Kalina Campus, Vidyanagari,
Santacruz (E), Mumbai – 400 098.

४. आपण सादर केलेल्या मोबाईल क्रमांकावर Passward SMS द्वारे आपणांस कळविण्यात येईल.

५. तद्नंतर, सदर Login ID and Passward वापरून ऑनलाईन Ph.D. Online Thesis Section (Ph.D. Research) या बटनावर क्लिक करून आपणांस आवश्यक असलेल्या पर्याय निवडावा.

६. आपल्या संस्थेद्वारे अदा करावयाचा शुल्क रकमेचा तपशिल आपणांस दिसेल. सदर रकमेचा भरणा ऑनलाईन प्रक्रियेद्वारे करावयाचा आहे व भरलेले शुल्क परत केले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

७. संगणकावर येणाऱ्या सुचनांप्रमाणे अर्ज संपुर्णपणे भरावा. एखादी बाब लागू नसल्यास Not Applicable असे लिहावे परंतू, कुठलाही रकाना रिकामा ठेवू नये किंवा "—" लिहू नये.

८. अर्जासोबत जोडावयाचे सर्व दस्ताऐवजांची PDF प्रत अपलोड करावी.

९. संपूर्ण अर्ज भरण्याची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर Sent to University या लिंकवर क्लिक करून अर्ज विद्यापीठास सादर करावा व संपूर्ण अर्जाच्या प्रतीची Printout घ्यावी.

१०. अर्जाची प्रत (Hard Copy) संपूर्ण दस्तऐवजांसह विद्यापीठास सादर करावी. सदर प्रत प्रत्यक्ष सादर करणे आवश्यक असेल. टपालाद्वारे अर्जाची प्रत स्विकारली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

११. ऑनलाईन प्रक्रियेत यशस्वीरित्या सादर करण्यात आलेले अर्जच पुढील मान्यतेच्या प्रक्रियेसाठी ग्राह्य धरले जातील. **ऑनलाईन अर्ज शेवटच्या तारखेनंतर म्हणजेच दि.३० सप्टेंबर, २०२२ नंतर स्विकारले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

मुंबई — ४०० ०९८
दिनांक — 30/08/2022

**कुलसचिव (प्र.)**

............................................................................................................

प्रत :—

१. संलग्नीत महाविद्यालयांतील संशोधन केंद्राचे प्राचार्य /संचालक.

२. संचालक, निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हीसेस प्रा.लि. नागपुर, माहितीस्तव तथा योग्य कार्यवाहीस्तव सादर.